<u>मुदतपूर्व बदली करण्याबाबत</u>:
श्री. एन. एन. केडिया, निरीक्षक
(गट-ब), राज्य उत्पादन शुल्क.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन आदेश क्रमांक : इएसटी-५०१९/प्र.क्र.४५/राऊशु-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९.

<u>शासन आदेश:-</u>

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(५) मधील तरतुदीनुसार राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक (गट-ब) संवर्गातील खालील अधिकाऱ्याची, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेने प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात येत असून, त्यांची पदस्थापना खालील स्तंभ (४) मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्याचे पद	नवीन पदस्थापना
१	**२**	**३**	**४**
१	श्री. एन.एन. केडिया	पांढरकवडा,जि. यवतमाळ	अचलपूर, जि. अमरावती.

२. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. सदर अधिकाऱ्यास या आदेशाच्या दिनांकापासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांनी त्यांना देण्यात आलेल्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होउन सदर पदाचा कार्यभार घ्यावा.

३. सदर आदेशाच्या दिनांकापासून उक्त अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी विहीत कालावधीमध्ये रूजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

४. सदर आदेशात बदल करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

५. सदर बदलीमुळे रिक्त झालेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागीय उप आयुक्त, राउशु यांनी करावी व तसे शासनास कळवावे.

६. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९१३१८०४०७९१२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

P H WAGDE

Digitally signed by P H WAGDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4f894edc0ea69760a3c1561515a6bf87, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=P H WAGDE
Date: 2019.09.13 20:17:39 +05'30'

(पु. हि. वागदे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३) विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ, अमरावती.
५) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ, अमरावती.
६) संबंधित अधिकारी.
७) निवडनस्ती (राउशु-१)

प्रत माहितीस्तव

१) मा. मंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव (राउशु) यांचे स्वीय सहायक.